पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **०२**

**सभावृत्तांत**

दिनांक - **२५/११/२०२१** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मामहिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा **गुरुवार** दिनांक **२५/११/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील पत्र.क्र.कोरोना - २०२०/प्र.क्र७६/नवि/-१४ दि.२२ ऑक्टोंबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

**१. मा.सविता बाळकृष्ण खुळे - सभापती**
२. मा.पवळे सुमनताई मधुकर
३. मा.मुंढे उषा अंकुश
४. मा. योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे
५. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.चारठाणकर- उप आयुक्त, मा.गोरखनाथ लिमण - कार्यालयीन अधिक्षक तथा प्र.उप-नगरसचिव, मा.बहादद्दरपुरे - समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१) बेरोजगार युवतींना प्रशिक्षण देणेबाबत.
मा.उषा मुंढे व मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) प्रवास भत्ता देणेबाबत.
मा.योगीता नागरगोजे व मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) बालेवाडीमधील मुलांना पोषक आहार देणेबाबत.
मा.उषा मुंढे व मा.योगीता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) आदिवासी महिला बचत गटांसाठी खाद्य (खेकडा) महोत्सव २०२१ आयोजन करणेबाबत.
मा.उषा मुंढे व मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

----------

अ) मा.महिला व बालकल्याण समिती सभा (कार्यपत्रिका क्रमांक **१८**)
दिनांक १४/१०/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) मा.महिला व बालकल्याण समिती सभा (**विशेष सभेचा)** (कार्यपत्रिका क्रमांक **०१**)
दिनांक १८/११/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक - २ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २५/११/२०२१
सुचक - मा.उषा मुंढे अनुमोदक - मा.रेखा दर्शले
संदर्भ - मा.उषा मुंढे व मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील सर्व प्रभागामध्ये बेरोजगार युवतींना प्रशिक्षण देण्यासाठी मनपाच्या सी.एस.आर. च्या माध्यमातून ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३ विषय क्रमांक - ०२
दिनांक - २५/११/२०२१
सुचक - मा.योगीता नागरगोजे अनुमोदक - मा.उषा मुंढे
संदर्भ - मा.योगीता नागरगोजे व मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव.

कोरोना काळात ज्या महिला विधवा झालेल्या आहेत त्यांचे महानगरपालिकेमार्फत कोर्सेस चालू करण्यात आलेले आहेत, अशा महिलांना प्रवास भत्ता देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २५/११/२०२१

सुचक - मा.उषा मुंढे अनुमोदक - मा.योगीता नागरगोजे

संदर्भ - मा.उषा मुंढे व मा.योगीता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व बालवाडीमधील मुलांना अन्नमित्र फाऊंडेशन व सह्याद्री आदीवासी महिला प्रतिष्ठान या दोन संस्थामार्फत पोषक आहार देणेस व पोषक आहार वाटप करणे, आहारावर गुणवत्ता नियंत्रण करणे इत्यादी कामे शिक्षण मंडळ विभागामार्फत करण्यास व याकामी आवश्यक असणारी तरतुद नागरवस्ती विकास योजना विभागाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २५/११/२०२१

सुचक - मा.उषा मुंढे अनुमोदक - मा.रेखा दर्शले

संदर्भ - मा.उषा मुंढे व मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

आदिवासी महिला बचत गटांसाठी खाद्य (खेकडा) महोत्सव डिसेंबर २०२१ मध्ये सांगवी येथे भरविण्यास तसेच त्यासाठी आवश्यक असणारे स्टॉल उभारणे व त्या अनुषंगाने लाईट व्यवस्था, स्वच्छता, पाणी व इतर अनुषंगिक सुविधा 'ड' क्षेत्रिय कार्यालयामार्फत करणेस तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन क्षेत्रिय कार्यालयामार्फत करणेस तसेच याकामी लागणारी तरतुद नागरवस्ती विभागातील मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत असणा-या "इतर योजना" या उपलेखाशिर्षावरील तरतुदीतून करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सविता बाळकृष्ण खुळे)**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/५४१/२०२१
दिनांक : ०३/१२/२०२१



**(गोरखनाथ लिमण)**
**कार्यालयीन अधिक्षक**
**तथा प्र. उप-नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.